Annexure IV(4),(Vide Article-4.05)

RNI No. MAHBIL/2009/31732
Reg. No. MH/MR/South-320/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग चार-अ

वर्ष ३, अंक ११] गुरुवार ते बुधवार, जुलै २८-ऑगस्ट ३, २०११/श्रावण ६-१२, शके १९३३ [पृष्ठे २०
[ किंमत : रुपये ४.०० ]

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ३० जून २०११.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक एफएसटी ०२/०९/प्र.क्र.८६/फ-४.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील वन विभागातील क्षेत्र सर्वेक्षक, गट-ब (अराजपत्रित) मुख्य लेखापाल, लेखापाल, सर्वेक्षक, वनपाल, लिपिक-नि-टंकलेखक व वनरक्षक गट-क या पदावरील सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे खालील नियम करीत आहेत:-

१. या नियमांना वनविभागातील क्षेत्र सर्वेक्षक गट-ब (अराजपत्रित) मुख्य लेखापाल, लेखापाल, सर्वेक्षक, वनपाल, लिपीक-नि-टंकलेखक व वनरक्षक गट-क पदांचे (सेवाप्रवेश) नियम २०११ असे म्हणता येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात.—

(अ) ''वृत्त'' म्हणजे आस्थापना विषयक बाबीसाठी जबाबदार असलेले मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)/वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या नियंत्रणाखाली प्रशासकीय घटक किंवा प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालयातील आस्थापना ;

(ब) ''पदवी'' म्हणजे मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली अन्य अर्हता ;

(क) ''वन विभाग'' म्हणजे शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अधिपत्याखालील वन विभाग ;

(ड) ''वनरक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम'' म्हणजे वनरक्षक यांना वनशास्त्र व संलग्न विषयासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी कोणत्याही वनरक्षक प्रशिक्षण विद्यालयामध्ये चालविण्यात येणारा १२ महिन्यांचा प्रशिक्षण पाठ्यक्रम ;

(इ) ''शासन'' म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(फ) ''उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा'' म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा अधिनियम क्र.४१) अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने कोणत्याही विभागीय शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शालांत परीक्षा यात शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अन्य परीक्षा समाविष्ट आहेत ;

(ग) ''मान्यता प्राप्त संस्था'' म्हणजे शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे अशी संस्था ;

(ह) ''माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा'' म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा अधिनियम क्र.४१) अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने कोणत्याही विभागीय शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शालांत परीक्षा, यात शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अन्य परीक्षा समाविष्ट आहेत ;

३. वन विभागातील "क्षेत्र सर्वेक्षक" गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नेमणुका वन विभागातील सर्वेक्षकाच्या राज्यस्तरीय जेष्ठता यादीच्या आधारे सर्वेक्षक पदावर तीन वर्षाहून कमी नाही इतकी नियमित सेवा झालेली आहे, अशा व्यक्तीच्या ज्येष्ठते अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येतील.

४. वन विभागातील "मुख्य लेखापाल" या पदावरील नेमणुका लेखापाल पदावर तीन वर्षाहुन कमी नाही इतकी नियमित सेवा झालेली आहे अशा व्यक्ती मधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येतील.

५. (१) वन विभागातील "लेखापाल" या पदावरील नेमणुका खालील मार्गाने करण्यात येतील :—

(अ) लिपिक-नि-टंकलेखक पदावर तीन वर्षाहून कमी नाही इतकी नियमित सेवा झालेली आहे अशा व्यक्तीच्या ज्येष्ठता अधीन पात्रता आणि ज्यांनी विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट प्राप्त केली आहे या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येतील,

किंवा

(ब) खालील अर्हता धारण केलेल्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे.—

(एक) ज्यांचे वय एकवीस वर्षापेक्षा कमी आणि तेहतीस वर्षाहून जास्त नाही.

(दोन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली आहे.

(२) लेखापाल पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुका ७५:२५ या गुणोत्तरात करण्यात येतील.

(३) नामनिर्देशनाने नेमणूक केलेल्या लेखापालांना वेळोवेळी विहित केलेल्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील आणि लेखापाल संवर्गातील परस्पर ज्येष्ठता विभागीय परीक्षा नियमातील तरतुदीप्रमाणे नियमित केली जाईल. तथापि, विभागीय परीक्षा नियमानुसार तो विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्यास पात्र राहील.

६. वन विभागातील "सर्वेक्षक" या पदावरील नेमणूक खालील अर्हता धारण केलेल्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.—

(एक) ज्यांचे वय अठरा वर्षापेक्षा कमी नाही आणि तेहतीस वर्षांहून जास्त नाही ;

(दोन) ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि ;

(तीन) ज्यांनी मान्यताप्राप्त संस्थेने सर्वेक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रम प्रमाणपत्र धारण केले आहे ;

७. (१) वन विभागातील "वनपाल" या पदावरील नेमणुका वनरक्षक पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या वृत्तस्तरीय वनरक्षकाच्या ज्येष्ठता यादीतील व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

(२) नियुक्त वनपाल यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानवसंसाधन व्यवस्थापन व प्रशासन) यांच्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल इतक्या कालावधीचे पदोन्नतीशी निगडीत उजळणी प्रशिक्षण वनपाल प्रशिक्षण विद्यालयात समाधानकारकरित्या पदोन्नतीनंतर तात्काळ पूर्ण करणे आवश्यक राहील. सदरहू प्रशिक्षण समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्याची पुढील वेतनवाढ रोखण्यात येईल. तथापि, रोखून ठेवलेली थकीत वेतनवाढ घेण्यास उमेदवार पात्र ठरणार नाही. पदोन्नत वनपालांना वयाची ५४ वर्षे पूर्ण केल्यावर प्रशिक्षणातून सूट देण्यात येईल. जर असा प्रशिक्षण कार्यक्रम संबंधित प्राधिकाऱ्यांनी संबंधित वर्षात आयोजित केला नसेल तर त्या वर्षात वेतनवाढ रोखली जाणार नाही.

८. (१) वन विभागातील "लिपिक-नि-टंकलेखक" या पदावरील नेमणुका खालील मार्गाने करण्यात येतील.—

(अ) वन विभागाच्या गट-ड पदावर ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व या नियमातील खंड (ब) मधील उप खंड (दोन) व (तीन) अन्वये नामनिर्देशनाने नेमणुकीसाठी विहित केलेली अर्हता धारण करत असलेल्या व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने करण्यात येईल,

किंवा

(ब) खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(एक) ज्यांचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी आणि तेहतीस वर्षांहून जास्त नाही ;

(दोन) ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे ; आणि

(तीन) ज्यांनी शासकीय वाणिज्य संस्थेचे इंग्रजी टंकलेखनाचे ४० शब्द प्रति मिनिट आणि मराठी टंकलेखन गती ३० शब्द प्रति मिनिट या गतीचे प्रमाणपत्र धारण केले आहे.

(२) लिपिक-नि-टंकलेखक पदावरील नामनिर्देशनाने व पदोन्नतीने करावयाच्या नेमणुका ७५:२५ या गुणोत्तराने करण्यात येतील :

परंतु असे की, कोणत्याही वर्षात पदोन्नतीच्या वाट्यातील रिक्त पदे भरण्यास योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास अशी रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्यात येतील.

(३) नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने लिपिक-नि-टंकलेखक पदावर नेमणुका दिलेल्या उमेदवारांना वेळोवेळी विहित केलेल्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

९. (१) (अ) वन विभागातील "वनरक्षक" पदावरील नेमणुका खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येतील :—

(एक) ज्यांचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नाही आणि पंचवीस वर्षांहून जास्त नाही ;

(दोन) ज्यांनी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण केली आहे ;

(तीन) जे खालील नमूद किमान शारीरिक पात्रता धारण करीत आहेत :—

| शारीरिक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (सें.मी. मध्ये) | १६३ | १५० |
| छातीचा घेर- | | |
| न फुगवता (सें.मी.मध्ये) | ७९ | - |
| फुगवून (सें.मी.मध्ये) | ८४ | - |
| वजन (कि.ग्रॅ.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

| शारीरिक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| अनुसूचित जमातीमधील उमेदवारासाठी खालीलप्रमाणे शिथिलक्षम.— | | |
| उंची (सें.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर | | |
| न फुगवता (सें.मी.मध्ये) | ७९ | - |
| फुगवून (सें.मी.मध्ये) | ८४ | - |
| वजन (कि.ग्रॅ.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

(चार) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.—

दूर दृष्टी

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

जवळील दृष्टी

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग यासंबंधीच्या आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानवसंसाधन व्यवस्थापन व प्रशासन) यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक व शारीरिक पात्रतेमध्ये सूट देण्यात येईल.—

(एक) शैक्षणिक पात्रता :—अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररीत्या जखमी झालेले वनखबरे व वन कर्मचाऱ्यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

(दोन) शारीरिक पात्रता :—नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररीत्या जखमी झालेल्या वनखबरे व वन कर्मचाऱ्यांच्या मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सूट देण्यात येईल.—

(१) उंची : पुरुष आणि स्त्री उमेदवारांसाठी २.५ सें.मी.

(२) छाती : मोजणी आवश्यक नाही.

(ड) खेळाडू प्रवर्ग : विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणाऱ्या खेळाडूंना, विहित उंची मध्ये २.५ सें.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) वन कर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत : सेवेत कार्यरत असताना मृत्यू पावलेल्या वन कर्मचाऱ्यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालीलप्रमाणे सवलत देण्यात येईल.—

(ए) उंची : पुरुष व स्त्री उमेदवारास २.५ सें.मी.

(बी) छाती : पुरुष उमेदवारांना २.० सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून.

(२) वनरक्षकांचे पदावर नियुक्ती झाल्यावर दोन हमी देणा-यासह लेखी करारनामा केल्यावर उमेदवारास वन विभागांच्या कोणत्याही राज्य वनरक्षक प्रशिक्षण विद्यालयातून चालविण्यात येणारा वनरक्षकांचा एक वर्षाचा अभिक्रम प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करावा लागेल व सदर प्रशिक्षण पाठ्यक्रमासाठी घेण्यात येणारी अंतिम परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहित केलेला प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा अंतिम परीक्षा प्रथम संधीत उत्तीर्ण करण्यास असमर्थ ठरलेल्या उमेदवारास सदरहू प्रशिक्षण पाठ्यक्रम स्वखर्चाने पूर्ण करण्यास व अंतिम परीक्षा उत्तीर्ण होण्यास आणखी एक संधी देण्यात येईल. उमेदवार दुसऱ्या संधीत प्रशिक्षण पाठ्यक्रम व अंतिम परीक्षा उत्तीर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास लेखी करारनाम्यानुसार त्यांच्याकडून प्रशिक्षणाचा खर्च व प्रदान केलेले वेतन वसूल करण्यास तसेच तो सेवतून काढून टाकण्यास पात्र राहील.

(३) नामनिर्देशनाद्वारे नेमणूक केलेल्या वनरक्षकाच्या नियुक्तीची आपसातील ज्येष्ठता, प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य किंवा संचालक यांनी अंतिम परीक्षेनंतर अधिसूचित केलेल्या प्रशिक्षण विद्यालयाच्या गुणवत्ता यादीतील क्रमाच्या आधारावर ठरविण्यात येईल. जर दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांचे प्राप्त एकूण गुण सारखेच असल्यास त्यांच्या वयाच्या आधारावर जेष्ठता निश्चित केली जाईल. जे उमेदवार वयाने ज्येष्ठ असतील अशा उमेदवारांचा क्रम कमी वयाच्या उमेदवारांच्या वर ठेवण्यात येईल.

१०. नियम ३, ४, ५, ६, ७, ८ व ९ मध्ये नमूद पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीस हिंदी व मराठी भाषा परीक्षा आधीच उत्तीर्ण केली नसल्यास किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्याला सूट मिळालेली नसल्यास त्यासंबंधात विहित केलेल्या नियमानुसार उक्त परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

११. नियम ३, ४, ५, ६, ७, ८ व ९ मध्ये नमूद पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

१२. सर्वेक्षक, लिपिक-नि-टंकलेखक, लेखापाल या पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्तीच्यावेळी वैद्यकीय पात्रता शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा यासंदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञ यांच्याकडून प्रमाणित करण्यात येईल.

१३. वनरक्षक, वनपाल, सर्वेक्षक, लिपिक-नि-टंकलेखक, लेखापाल व मुख्य लेखापाल या पदावर नियुक्त व्यक्ती वृत्तस्तरावर कोठेही बदलीस पात्र राहील व क्षेत्र सर्वेक्षक पदावर नियुक्त व्यक्ती राज्य स्तरावर कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रविण परदेशी,**
शासनाचे प्रधान सचिव.